विशेष खटला क्रमांक २२५ ऑफ २०२४
साक्षीदार क्रमांक ३ निशाणी क्रमांक ३८

साक्षीदाराचे सत्यप्रतिज्ञेवर निवेदन

नाव: रोहित जयकुमार राऊत
वय: २८ वर्षे
काम: कनिष्ठ लिपिक जिल्हा उपनिबंधक कार्यालय अमरावती
राहणार: पुंडलिक बाबा नगर अमरावती

(आरोपी कारागृहांमधून व्हिडिओ कॉन्फरन्सिंग वर जोडला गेला आहे तसेच साक्षही इन कॅमेरा नोंदवण्यात येत आहे, जशी जशी साक्ष रेकॉर्ड होत आहे त्यामध्ये नोंदविले जाणारे वाक्य हे आरोपीला स्क्रीनवर दिसत आहेत)

सर तपासणी अभियोग पक्षातर्फे जिल्हा शासकीय अभियोक्ता मंगेश भागवत यांचे मार्फत

दिनांक ३१ जुलै २०२४ रोजी राजापेठ पोलीस ठाणे मार्फत आम्हाला सूचना पत्र प्राप्त झाले होते ज्यामध्ये आम्हाला पंच म्हणून काम करण्याची विनंती केली होती. त्या पत्रातील विनंती प्रमाणे आमच्या कार्यालयाने माझे आणि हांडे मॅडम यांचे नाव पंच म्हणून काम करण्यासाठी सुचविले होते. पोलीस ठाण्याकडून आम्हाला आम्हा दोघांच्या नावाने सूचना पत्र प्राप्त झाली होती. आता मला ते पत्र दाखवले ते आमच्या नावाने अग्रेषित आहे. ते पत्र आम्हाला मिळाले आणि त्यानुसार आम्ही पंच म्हणून पोलीस ठाण्यामध्ये त्याच दिवशी हजर झालो. <u>सूचना पत्र निशाणी ३९ वर आहे.</u> पोलिसांनी आम्हाला राजापेठ येथील अंडरपासच्या जवळ गेले. घटनास्थळ आमच्या सोबतच्या पोलिसांनीच दाखवले. ज्यांच्या बरोबर ही घटना घडली होती त्याच्या आईने हे घटनास्थळ आम्हाला दाखवले. घटनास्थळ हे शीतला माता मंदिराचे स्थान आहे. ते स्थान अंडर बायपासच्या खाली होते मंदिरापासून जवळ होते. पोलिसांनी ज्या जागेवर गुन्हा घडला ते स्थान दाखवल्यानंतर दिसत्या परिस्थितीचा पंचनामा तयार केला. तू पंचनामा आमच्या समक्ष तयार केला. आम्ही तो वाचून खात्री करून त्यावर सही केली. आता मला पंचनामा दाखवला त्यावर अनुक्रमांक एक वर हंडे मॅडम यांची सही आहे आणि अनुक्रमांक दोन वर माझी सही आहे. त्या दोनही सह्या मी ओळखतो. पंचनामा मधील मजकूर दिसत्या परिस्थितीप्रमाणे खरा व बरोबर आहे. घटनास्थळ पंचनामा ज्या ठिकाणी

घटना घडली त्याच ठिकाणी पोलिसांनी तयार केला व आम्ही त्यावर सह्या केल्या. घटनास्थळ पंचनामा निशाणी ४० वर आहे. (अतिरिक्त सरकारी अभियंता श्री मंगेश भागवत न्यायालयासमोर कथन करतात की त्यांनी या प्रकरणातील मुद्देमाल लवकरात लवकर न्यायालयात हजर करावा अशी लेखी सूचना पोलीस ठाण्याला आणि संबंधित तपासी अधिकाऱ्याला दिलेली आहे. या प्रकरणातील आरोपी हा न्याय बंदी असल्यामुळे मुद्देमालाची वाट बघत थांबता येणार नाही. आरोपी न्याय बंदी आहे याची कल्पना असताना देखील न्यायालयासमोर जप्त केलेला मुद्देमाल आणि रासायनिक विश्लेषणासाठी पाठविलेला अहवाल न दाखल करणे याचे परिणाम संबंधितांना सोसावे लागतील मात्र मला खटला त्या कारणासाठी थांबवून ठेवता येणार नाही)

२. घटनास्थळ पंचनामा झाल्यानंतर मला एक ऑगस्ट २०२४ रोजी पोलिसांनी पोलीस ठाण्यात बोलाविले होते. माझ्यासोबत हंडे मॅडमला देखील पोलिसांनी बोलाविले होते. अंदाजे अकरा बारा वाजता मी पोलिस ठाण्यात हजर झालो असेल. त्यादिवशी पोलिसांनी माझ्या समक्ष आरोपीचे कपडे ज्यामध्ये मरून कलरचे शर्ट, निळी जीन्स पॅन्ट असे जप्त केले. जप्तीपत्रकावर कपडे जप्त केल्याबाबत पोलिसांनी आमच्या पंच म्हणून सह्या घेतल्या. कपडे जप्त केल्याबाबत पोलिसांनी आमच्या पंच म्हणून सह्या घेतल्या. आम्ही जप्तीपत्र वाचून त्यावर सह्या केल्या. आता मला ते जप्तीपत्र दाखवले त्यावर अनुक्रमांक एक वर हांडे मॅडमची सही आहे व अनुक्रमांक दोन वर माझी सही आहे दोनही सह्या मी ओळखतो. जप्ती पत्र ज्यामध्ये आरोपीचे कपडे जप्त केले आहेत ते निशाणी ४१ वर आहे. ज्या आरोपीकडून ते कपडे जप्त केले आहेत त्याला जर मला दाखवले तर त्याला मी ओळखू शकेल. आता मला स्क्रीनवर एक मुलगा हेडफोन घालून दिसत आहेत. जो मुलगा हेडफोन घालून दिसत आहे त्याच्याकडूनच पोलिसांनी कपडे जप्त केले होते. तो मुलगा आज कोर्टासमोर व्हिडिओ कॉन्फरन्सिंग मार्फत साक्ष ऐकत आहे.

आरोपी तर्फे उलट तपासणी मोहित जैन वकील साहेब यांचे मार्फत **:**

३. घटनास्थळ हे शितला माता मंदिरच्या अंडरपासच्या खाली आहे असे मी चुकीचे सांगत असल्याचा आरोप मला मान्य नाही. मी घटनास्थळावर प्रत्यक्ष गेलो आणि

माझ्या प्रत्यक्ष उपस्थितीमध्ये पोलिसांनी पंचनामा तयार केल्याचे मी खोटे सांगत असल्याचा आरोप मला मान्य नाही. माझा उपस्थितीमध्ये पोलिसांनी पोलीस ठाण्यामध्ये आरोपीचे कपडे जप्त केल्याचे मी खोटे सांगत आहे हा आरोप मला मान्य नाही. हे खरे आहे की माझ्या वरिष्ठांनी मला पोलीस ठाण्यात जाण्याच्या आदेश दिले होते आणि पोलिसांच्या सूचनेनुसार कार्यवाही करण्याचे देखील आदेश दिले होते. हे खरे आहे की पोलिसांनी जसे सांगितले त्याप्रमाणे मी वागलो. हे खरे आहे की पोलिसांच्या सांगण्यावरून मी पंचनामावर सह्या केल्या. मी घटनास्थळावर गेलो नाही, घटनास्थळावर कोणताही पंचनामा तयार करण्यात आला नाही, आज मी पोलिसांच्या सांगण्यावरून खोटी साक्ष देत आहे हा आरोप मला मान्य नाही.

उलट तपासणी पूर्ण करण्यात आला.

फेर तपासणी काहीही नाही.

निवेदन श्रवणोत्तर स्वीकृत

दि.०९/०१/२०२६

स्वा/-

(यशवंत गोस्वामी)
विशेष न्यायाधीश (पोक्सो)
अमरावती

--------------------------

साक्षीदाराची सही

विशेष खटला क्रमांक २२५ ऑफ २०२४

साक्षीदार क्रमांक ४ निशाणी क्रमांक ४२

साक्षीदाराचे सत्यप्रतिज्ञेवर निवेदन

नाव: संतोष लालमण कुरोटिया
वय: ५० वर्षे
काम: ऑटो चालक
राहणार: राजापेठ अमरावती

(आरोपी कारागृहांमधून व्हिडिओ कॉन्फरन्सिंग वर जोडला गेला आहे तसेच साक्षही इन कॅमेरा नोंदवण्यात येत आहे, जशी जशी साक्ष रेकॉर्ड होत आहे त्यामध्ये नोंदविले जाणारे वाक्य हे आरोपीला स्क्रीनवर दिसत आहेत)

सर तपासणी अभियोग पक्षातर्फे जिल्हा शासकीय अभियोक्ता मंगेश भागवत यांचे मार्फत

मी ऑटो चालक दिलीप गायधरे यांना ओळखतो. त्यांचे राहणे राजापेठ चौकात आहे. मी माझा ऑटो राजापेठ वरून दस्तुरनगर यशोदा नगर येथपर्यंत चालवतो. माझे जाणे येणे अंडर बायपास खालून आहे. अंडरपासच्या जवळच आमचे ऑटो स्टॅन्ड आहे. मी सकाळी 11 वाजता माझा व्यवसाय सुरू करतो. दिनांक 31 जुलै 2024 रोजी मी घरीच होतो. दिनांक 31 जुलै 2024 रोजी मी अंडरपासच्या ऑटो स्टॅन्ड जवळ उभा होतो साधारण सात-साडेसात वाजताच मी तिथे उभा होतो आणि आठ-साडे आठच्या सुमारास मला अंडरपास खालून मोठ्याने आवाज आला असे काही घडले नाही.

अभियोग पक्ष साक्षीदाराच्या उलट तपासणीची परवानगी मागतो - परवानगी देण्यात आली

२. काही ऑटो चालकांचा मुलीचा जीव वाचवला म्हणून पोलिसांच्या वतीने सत्कार करण्यात आला ही बाब मला माहित नाही. मी, फोडेकर, गायधरे, या ऑटो चालकांची पोलिसांनी चौकशी केली होती याबाबत मला माहित नाही. दिनांक 31 जुलै 2024 रोजी मी अंडरपासच्या ऑटो स्टैंड वर उभा असताना मला आठ साडेआठ वाजता अंडरपास मधून आवाज आला मी तिथे गेलो असता पीडित मुलीला एक मुलगा कशाने तरी मारहाण करीत होता आम्ही धावत त्याच्याजवळ गेलो असता ऑटो चालक गायधरे यांची मुलगी

असल्याचे मला कळाले व मुलगा प्रफुल्ल काळकर यालाही मी ओळखले, सूचना मला मान्य नाही व ती चुकीची आहे. प्रफुल्लने पीडित मुलीला गळ्यावर चाकू मारल्याने तिच्या गळ्यातून रक्त निघत होते, प्रफुल्ल काळकर पळून जात असताना आम्ही त्याला पकडले आणि पोलिसांच्या ताब्यात दिलले ही सूचना मला मान्य नाही. आता मला माझ्या बयानातील अधोरेखित भाग अ वाचून दाखवला. तो मला मान्य नाही तो चुकीचा आहे. पोलिसांनी माझ्या बयानामध्ये असा भाग का लिहून घेतला ते मला माहित नाही. मी प्रफुल्ल काळकर ला ओळखतो आणि त्याला वाचवण्यासाठी आज न्यायालयामध्ये शपथेवर खोटे बोलत आहे, हे मला मान्य नाही.

उलट तपासणी आरोपीतर्फे देशपांडे वकिलांकरिता श्री मोहित जैन यांनी नाकारली**.**
उलट तपासणी पूर्ण करण्यात आला.

फेर तपासणी काहीही नाही.

निवेदन श्रवणोत्तर स्वीकृत

दि.०९/०१/२०२६

स्वा/-

(यशवंत गोस्वामी)
विशेष न्यायाधीश (पोक्सो)
अमरावती

--------------------------

साक्षीदाराची सही